**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मजूरा मार्फत करावयाच्या इनलेट व आऊटलेट विरहित शेततळयाचे आर्थिक मापदंड सुधारणे.**

**महाराष्ट्र शासन.**
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : मग्रारो२००९/प्र.क्र.१६६/मग्रारो-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २३ जुलै,२०१०

**वाचा :-**

१) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र रोहयो-१००५/प्र.क्र.१६६/मग्रारो-१ दिनांक २५ ऑक्टोंबर, २००५.

२) शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र मजुरी-२००९/प्र.क्र.१९९/मग्रारो-१ दिनांक ९ नोव्हेंबर, २००९.

**प्रस्तावना:**

पावसाचे वाहून जाणारे अतिरिक्त पाणी यंत्राद्वारे उचलून शेततळयामध्ये साठविणे व साठविलेले पाणी दिर्घ कालावधीतील पावसाच्या खंडामध्ये पिकांना देणे तसेच ठिबक व तुषार संच वापरुन पाण्याचा अत्यंत कार्यक्षम वापर करुन त्याचा उपयोग फळबाग व नगदी पिकांना करणे यासाठी इनलेट/आऊटलेट विरहित शेततळे घेण्याबाबत शेतकरी व लोकप्रतिनिधीकडून वारंवार मागणी होत होती. यासंदर्भात संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पुणे यांनी इनलेट / आऊटलेट विरहित शेततळयाचे तांत्रिक व आर्थिक मापदंड निश्चित करण्याकरीता सादर केलेल्या प्रस्तावाचा शासन निर्णय क्र.१ दिनांक २५.१०.२००५ च्या आदेशान्वये गठीत केलेल्या तांत्रिक समितीने सखोल अभ्यास करुन दिनांक ११.२.२०१० रोजी शासनास शिफारशी सादर केल्या. तांत्रिक समितीने सादर केलेल्या शिफारशींचा सखोल अभ्यास करुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णय :-**

जल व मृदसंधारणाच्या मजूरा मार्फत करावयाच्या इनलेट/आऊटलेट विरहित शेततळयाचे कामासाठी तांत्रिक व आर्थिक मापदंड पुढीलप्रमाणे सुधारण्यात / निश्चित करण्यात येत आहे :-

(ज.भि.पवार)
कार्यासन अधिकारी (रोहयो)

( बा. बा. नारायणकर)
उपसचिव नियोजन विभाग.

रोटा/एच-१८८०[१०००-७-१०]-१

D:\2009\EGS-109CR-166wp.lwp

**मजूरांव्दारे करावयाच्या इनलेट/आऊटलेट विरहित शेततळयांचे तांत्रिक व अर्थिक मापदंड :-**

| इनलेट / आऊटलेट विरहित शेततळे | तांत्रिक मापदंड | | | आर्थिक मापदंड | |
|---|---|---|---|---|---|
| | अ.क्र. | आकारमान (मी.) | परिमाण घ.मी. | इनलेट / आऊटलेट विरहित शेततळे (मजूरा द्वारे ) रुपये १०० / १०५ प्रतिदिन | |
| | | | | प्रति.ह.घ. मी. | आर्थिक मापदंड (प्रति शेततळे) रुपये |
| | १ | २०X१५X३ | ६२१ | ७४९७५ | ४६५६० |
| | २ | २०X२०X३ | ८७६ | ७४७२८ | ६५४६१ |
| | ३ | २५X२०X३ | ११३१ | ७४९८१ | ८४८०३ |
| | ४ | २५X२५X३ | १४६१ | ७४९५४ | १०९५०९ |
| | ५ | ३०X२५X३ | १७९१ | ७४८३९ | १३४०३७ |
| | ६ | ३०X३०X३ | २१९६ | ७६४५६ | १६७८९८ |

२. सदरचे तांत्रिक व आर्थिक मापदंड फक्त महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मजूरामार्फत करावयाच्या कामासाठी लागू असतील व ते खर्चाच्या दृष्टीने अत्यंत काटकसरीने व काळजीपुर्वक वापरण्याची संबंधितांनी दक्षता घ्यावी. प्रस्तुत खर्चाचे (तांत्रिक / आर्थिक ) मापदंड केवळ प्रत्यक्ष कामाच्या भागापुरतेच मर्यादित आहेत. इनलेट / आऊटलेट विरहित शेततळ्याचे सोबत जोडलेले संकल्प चित्रास मान्यता देण्यात येत आहे. याबाबतच्या आवश्यक त्या तांत्रिक मार्गदर्शक सूचना व संकल्पचित्र (टाईप डिझाइन्स) आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तातडीने निर्गमित कराव्यात.

३. इनलेट/आऊटलेट विरहीत शेततळयास भविष्यात प्लॅस्टिकच्या आच्छादनाचे अनुदान शासनाकडून दिले जाणार नाही किंवा कृषि आयुक्तालयाकडून त्याची मागणी केली जाणार नाही तसेच लाभार्थी फरकाच्या रक्कमेची मागणी करणार नाही या अटीच्या अधीन राहून इनलेट/आऊटलेट विरहित शेततळे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २८२/१०/व्यय-८, दिनांक २२.६.२०१० अन्वये तसेच जलसंधारण विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००७२३१८४७५०००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(ज.भि.पवार)**
**कार्यासन अधिकारी (रोहयो)**

**( बा. बा. नारायणकर)**
**उपसचिव, नियोजन विभाग.**

एच-१८८०-१३


D:\2009\EGS-109CR-166wn.lwn

प्रत, 

मा.मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव,
सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव (रोहयो), ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई.
सर्व प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय, मुंबई.
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे.
संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, पुणे.
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
सर्व अधिकारी (रोहयो प्रभाग), नियोजन विभाग,
जलसंधारण विभागातील सर्व अधिकारी, जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई.
निवडनस्ती, रोहयो-१/सारसंग्रह रोहयो-१.

# इनलेट/आऊटलेट विरहित शेततळयाचे नमुना संकल्पचित्र

(शेततळयाचे आकारमान ३० x ३० x ३ मी.)




(श्री. ज. भि. पवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग, (रो.ह.यो.)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

बा. बा. नारायणकर
उप सचिव
नियोजन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.